जिल्हा परिषद, पंचायत समित्या व महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका २०१२ करिता त्या क्षेत्रातील दुकाने, आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्नगृहे, नाटयगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापनांमध्ये कार्यरत असलेल्या मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
शासन परिपत्रक क्रमांक:- संकीर्ण-२०१२/प्र.क्र.६/कामगार-९
दिनांक :- ६ फेब्रुवारी, २०१२

संदर्भ : (१) राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१८/का.५, दि.३.२.२०१२ चे पत्र

(२) राज्य निवडणूक आयोग,मुंबई क्रमांक- रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.-४/का-५, दि.-२९/१०/२०१० चे पत्र.

## परिपत्रक

राज्य निवडणूक आयोगाने सोबत जोडलेल्या यादीनुसार जिल्हा परिषद व त्या अंतर्गत पंचायत समित्यांच्या आणि महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणूका त्यासमोर दर्शविलेल्या तारखांना घेण्याचे ठरविले आहे.

२. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए अन्वये राज्य निवडणूक आयोगावर महानगरपालिकांच्या निवडणुकांची जबाबदारी सोपविलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १४ (४) मधील तरतुदीनुसार निवडणुका शांत, मुक्त व निर्भय वातावरणात घेण्याकरिता निदेश देण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास आहेत.

३. त्यानुसार जिल्हा परिषद, पंचायत समित्या व महानगरपालिका क्षेत्रातील मतदारांना मतदानाचा हक्क बजावण्याची योग्य संधी प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने या क्षेत्रातील दुकाने, आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्नगृहे, नाटयगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापनांमध्ये कार्यरत असलेल्या मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याबाबत योग्य ते निदेश सर्व संबंधितांना तात्काळ देण्याबाबत संदर्भ क्रमांक (१) वरील पत्रान्वये राज्य निवडणूक आयोगाने कळविले आहे.

४. या पार्श्वभूमीवर शासन आदेश देत आहे की, दुकाने आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्नगृहे, नाटयगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापनां यांना सूचना देण्यात येत आहेत की,

(१) सोबत जोडलेल्या यादीतील स्थानिक स्वराज्य संस्थांचे बाबतीत मंगळवार दि. ७ फेब्रुवारी, २०१२ रोजी आणि महानगरपालिका क्षेत्राबाबतीत गुरुवार दि.१६ फेब्रुवारी,२०१२ रोजी सर्व दुकाने, आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्नगृहे, नाटयगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर

आस्थापनां यात कामगारांना सदर निवडणूकीच्या दिवशी मतदांनाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी.

(२) मतदानाच्या दिवशी अनुपस्थितीमुळे धोका अथवा मोठया प्रमाणावर नुकसान होईल अशा उद्योगांतील कामगार मतदारांना हे परिपत्रक लागू होणार नाही. परंतु अशा आस्थापनेतील/ उद्योगातील कामगारांना मतदान हक्क बजावण्यासाठी दोन तासाची विशेष सवलत देण्यात यावी.

५. सर्व दुकाने, आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, नाट्यगृहे, व्यापार औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापनांच्या मालक/आस्थापनांनी वरील आदेशाचे योग्य अनुपालन होईल, याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक२०१२०२०६०७५९४५२४५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(विद्याधर कानडे)
प्रधानसचिव (कामगार)

प्रत - उपरोक्त परिपत्रक सर्व संबंधीत आस्थापनांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह अग्रेषित:-

१.प्रधान सचिव(उद्योग),उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२.अवर सचिव (कार्यासन-५), राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकिय भवन, मुंबई-३२.
३.कामगार आयुक्त, बांद्रा, मुंबई.
४.संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, बांद्रा, मुंबई.
५.संचालक, बाष्पके, संचालनालय, बांद्रा, मुंबई.
६.संचालक, कै. नारायण मेघाजी लोखंडे, महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, परेल, मुंबई.
७.कल्याण आयक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, एलफिन्स्टन रोड, मुंबई.
८.आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
९.आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे,
१०.आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, ठाणे,
११.आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे,
१२.आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे,
१३.आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर,
१४.आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक,
१५.आयुक्त, अकोला महानगरपालिका, अकोला,
१६.आयुक्त, अमरावती महानगरपालिका, अमरावती,
१७.आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर,
१८.जिल्हाधिकारी ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, जळगाव, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली,
१९.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, जळगाव, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली,
२०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२१.कामगार विभागातील सर्व कार्यासने
२२.निवडनस्ती (कामगार-९)

प्रत माहितीसाठी :-

१.मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव मंत्रालय,मुंबई
२.मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव मंत्रालय,मुंबई
३.मा.मुख्यसचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय,मुंबई

शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१२/प्र.क्र.६/कामगार-०, दिनांक ६ फेब्रुवारी.२०१२ चे सहपत्र स्थानिक स्वराज्य संस्था महानगरपालिकांच्या निवडणूकीच्या मतदानाच्या दिनांकाबाबतचा तपशील

## जिल्हा परिषदा व त्या अंतर्गत पंचायत समित्या

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव | मतदानाचा दिनांक |
|---|---|---|
| १ | ठाणे | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| २ | रायगड | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| ३ | रत्नागिरी | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| ४ | सिंधुदुर्ग | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| ५ | पुणे | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| ६ | सातारा | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| ७ | सांगली | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| ८ | सोलापूर | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| ९ | कोल्हापूर | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| १० | नाशिक | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| ११ | जळगाव | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| १२ | अहमदनगर | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| १३ | औरंगाबाद | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| १४ | जालना | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| १५ | परभणी | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| १६ | हिंगोली | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| १७ | बीड | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| १८ | नांदेड | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| १९ | उस्मानाबाद | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| २० | लातूर | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| २१ | अमरावती | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| २२ | बुलढाणा | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| २३ | यवतमाळ | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| २४ | नागपूर | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| २५ | वर्धा | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| २६ | चंद्रपूर | ७ फेब्रुवारी, २०१२ |
| २७ | गडचिरोली | ७ फेब्रुवारी, २०१२ |

१) गडचिरोली जिल्हयातील एकूण १२ तालुक्यापैकी कोरची, कुरखेडा, देसाईगंज आरमोरी, गडचिरोली, धानोरा, चामोर्शी, मुलचेरा या ८ तालुक्यातील ३५ निवडणूक विभाग व ७० निर्वाचक गणात दि ७.२.२०१२ रोजी व उर्वरित अहेरी, एटापल्ली, भामराग, सिरोंचा या ४ तालुक्यातील १६ निवडणूक विभाग व ३२ निर्वाचक गणात दि.१२.२.२०१२ रोजी मतदान होणार आहे.

### महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई | १६ फेब्रुवारी, २०१२ |
| २ | ठाणे | १६ फेब्रुवारी, २०१२ |
| ३ | उल्हासनगर | १६ फेब्रुवारी, २०१२ |
| ४ | पुणे | १६ फेब्रुवारी, २०१२ |
| ५ | पिंपरी-चिंचवड | १६ फेब्रुवारी, २०१२ |
| ६ | सोलापूर | १६ फेब्रुवारी, २०१२ |
| ७ | नाशिक | १६ फेब्रुवारी, २०१२ |
| ८ | अकोला | १६ फेब्रुवारी, २०१२ |
| ९ | अमरावती | १६ फेब्रुवारी, २०१२ |
| १० | नागपूर | १६ फेब्रुवारी, २०१२ |